**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०३ /२०१०**
**अपिल क्र. ४०४ /२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. बापुराव फैलुजी बाहे,
२८, रामकृष्ण कॉलनी,
दंत महाविद्यालयाजवळ, कॅम्प, अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती.
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव / प्रभारी मुख्याध्यापिका,
निवासी मतिमंद विदयालय, पॅराडाईज कॉलनी,
अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. बापुराव फैलुजी बाहे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा श्री.ए.व्ही. शेळके, सचिव, निवासी मतीमंद विदयालय, अमरावती हे हजर आहेत.

अर्जदाराला अपिल क्रमांक ४०३/२०१० व ४०४/२०१० या दोन्ही अपिलाच्या सुनावणीकरिता अर्जदार हजर आहेत. अर्जदाराला सदर प्रकरणात माहिती पुरविण्यात आलेली आहे. माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला त्यातुन माहिती मिळाली आहे. उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार याआधी सुध्दा दिनांक २३/१२/२००९ ला माहिती पाठविण्यात आली होती असे लेखी दिले आहे. सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी नंतर अपिलीय अधिकारी हे संबंधित संस्थेचे अध्यक्ष असतात असे सांगितले. तरी, याबाबत समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी तशा सुचना संबंधित संस्थेला दिल्या आहे. तरी हयाबाबत अपिलीय अधिकारी म्हणुन अध्यक्ष यांचेकडे अपिल दाखल करावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. लालचंद टिल्लुराम पितळे,
३ रा माळा, चामुंडा अपार्टमेन्ट,
सेन्ट शाळेजवळ, गितानगर, हिंगणा रोड, अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विकास), अकोला महानगरपालिका,
अकोला, जि.अकोला.
२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,
अकोला महानगरपालिका, अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. लालचंद टिल्लुराम पितळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी लेखापाल, महानगरपालिका, अकोला श्री.व्ही.एल. मांडेकर हे हजर आहेत.

अर्जदाराला हया आयोगासमोर माहिती पुरविण्यात आली आहे. माहिती मिळाल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले आहे. करिता सदरचे अपिल खारीज करण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०५ / २०१०**
**जा.क्र.**

दि.

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. लालचंद टिल्लुराम पितळे,
३ रा माळा, चामुंडा अपार्टमेन्ट,
सेन्ट शाळेजवळ, गितानगर, हिंगणा रोड, अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, अकोला, जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी
तथा सचिव, ग्रामपंचायत अकोली खुर्द,
ता.जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. लालचंद टिल्लुराम पितळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला श्री.व्हि.बी. राजपुत हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, अकोली खुर्द श्री.राऊत हे हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५/०१/२०१० रोजी निकाल देतांना असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेल्या माहिती पैकी जी माहिती ग्रामपंचायतशी संबंधित आहे व जी ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध आहे ती माहिती अर्जदार यांना दिनांक १०/०२/२०१० पर्यंत विनाशुल्क देण्यात यावी व जी माहिती इतर कार्यालयाचे संबंधित असेल त्यांचेकडे अर्जदार यांच्या अर्जाची छायाप्रत पाठवावी. तरी, सदर प्रकरणात जी माहिती ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध नाही त्याकरिता उपविभागीय अधिकारी,अकोला यांचेकडे माहितीचे निरीक्षणाकरिता अर्ज करावा. त्यानंतरही माहिती मिळाली नाहीतर त्याबाबत या आयोगाकडे तक्रार करावी .

वरील आदेश देवुन अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
उप विभागीय अधिकारी, महसुल, अकोला

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०७ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रमेश हरि राठोड,
मु.सुधाकर नगर, पो.पेढी,
ता.महागांव, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी,
तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, महागांव, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. रमेश हरि राठोड हे उशिरा हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ श्री.प्र.स. देव हे उशिरा हजर झालेत. जन माहिती अधिकारी तर्फे कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, महागांव श्री.बी.व्ही. हस्तक हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले कनिष्ठ सहाय्यक, श्री.बी.व्ही. हस्तक यांचे म्हणण्यानुसार माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) नुसार अर्जदाराने दिनांक २४/११/०९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. त्यानुसार प्रथम अपिलात दिनांक ०४/०१/२०१० ला सुनावणी ठेवण्यात आली होती, परंतु अर्जदार हे गैरहजर होते तसेच अधिक्षक सुध्दा गैरहजर असल्यामुळे कुठलाही आदेश पारित करण्यात आला नाही.

तरी, सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयाच्या आंत सुनावणी घेवुन जन माहिती अधिकारी व अर्जदार यांचे म्हणणे ऐकुन घ्यावे व जन माहिती अधिकारी यांचेकडुन अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दयावी. अर्जदार सुनावणीस गैरहजर राहील्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येऊन योग्य तो आदेश पारित करावा व आदेशाची प्रत अर्जदारास पाठविण्यात यावी. सदर आदेशात प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्रथम अपिलात निर्णय देण्याचे आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०८/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. जयंत संपतराव मोहोळ,

मनोरथ कॉलनी, माधुरी वाईन बारच्या मागे,
डाबकी रोड, अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
अमरावती, जि.अमरावती.

२. जन माहिती अधिकारी,
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पदूम),
अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कनिष्ठ लिपीक, दुग्धव्यवसाय विकास (प्रादेशिक) अधिकारी कार्यालय, अमरावती श्री. एस.एस. ढोके हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पदूम), अकोला श्री.एस.डब्ल्यु. डोंगरे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा दुध संकलन पर्यवेक्षक, कार्यालय जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी, अकोला श्री.ए.पी. राऊत हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दिनांक १०/०३/२०१० ला दाखल केले आहे व त्यात दुसरे अपिल दाखल करण्याचे प्रयोजनमध्ये माहिती अपुर्ण, चुकीची व दिशाभुल करणारी मिळाल्यामुळे दाखल केले असे म्हटले आहे. अर्जदाराला दिनांक १०/११/०९ ला माहिती पुरविण्यात आलेली आहे व त्यावर अर्जदाराची स्वाक्षरी आहे.

अर्जदार गैरहजर असल्यामुळे कुठली माहिती अपुर्ण, चुकीची व दिशाभुल करणारी आहे याची शहानिशा होवु शकली नाही म्हणुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४०९/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री. विठ्ठल नारायण दुतोंडे,
मु.गुंजाळा, पो.मेरा बु., ता.चिखली,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
चिखली, ता.चिखली, जि.बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
कृषी पर्यवेक्षक, मेरा बु., ता.चिखली,
जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, मेरा बु. श्री.के.एल. कंकाळ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी पर्यवेक्षक, मेरा बु. श्री.आर.बी. सोनोने हे हजर आहेत.

अर्जदाराने तालुका कृषी अधिकारी, चिखली यांना दिनांक ११/०८/२०१० ला असे लिहुन दिले की, आपल्या कार्यालयामध्ये मागितलेली माहितीने समाधान झाले व तक्रार राहीली नाही. अर्जदाराला दिनांक ११/०८/२०१० ला व त्याआधी दिनांक १८/०१/२०१० ला अशी दोन वेळेला माहिती पुरविण्यात आली म्हणुन अर्जदाराचे समाधान झाले म्हणुन अर्जदार गैरहजर आहे असे गृहित धरुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४१० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. हफीज उल्ला खाँ हमिद उल्ला खाँ,
रा.सैय्यद जमालपुरा, वार्ड नं१३,
आठवडी बाजार, मु.पो.ता.नांदुरा, जि.बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी,
वक्क मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद,
जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी,
वक्क मंडळ, पानचक्कीजवळ, औरंगाबाद,
जि.औरंगाबाद.

**(आदेश पारीत दिनांक २१/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. हफीज उल्ला खाँ हमिद उल्ला खाँ हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने दिनांक ०९/०७/०९ रोजी जन माहिती अधिकारी, वक्क मंडळ, औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल केला होता व त्यात दिनांक ०४/०३/०९ ला सुनावणीसाठी ठेवण्यात आलेल्या प्रकरणात हरकत घेणारे संबंधित यांना नोटीस काढण्यात आली त्या सुनावणी नोटीस बाबत माहिती मागितली होती. सदरची माहिती दि.१७/०१/०९ ते ०९/०७/०९ या कालावधीतील होती व त्यानंतर अर्जदाराने दिनांक २१/१०/०९ ला तक्रार अर्ज दाखल केला व त्यात कुठल्याच प्रकारची माहिती मिळाली नाही व सदरची माहिती पुरविण्यात यावी असे म्हटले आहे. त्यानंतर दिनांक १५/०२/२००९ ला प्रथम अपिल दाखल केले व सदर प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्यानंतर कुठल्याच प्रकारची सुनावणी अर्जदारास दिलेली नाही त्यामुळे अर्जदाराने व्दितीय अपिल या आयोगासमोर दाखल केले.

तरी, सदर प्रकरणात अर्जदाराचे प्रथम अपिल दिनांक १५/०२/२००९ हे हा आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयाच्या आंत अर्जदाराला आगावु सुनावणी नोटीस देण्यात यावी व सुनावणीचे वेळी अर्जदाराचे म्हणणे ऐकुन घेण्यात यावे व अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन का दिली नाही याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन जबाबदारी निश्चित करुन योग्य तो निर्णय देवुन आदेश पारित करावा व आदेशाची प्रत अर्जदाराला पाठविण्यात यावी. सदर प्रकरणात जर आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयात सुनावणी दिली नाही व अर्जदाराला कुठलीच माहिती दिल्या गेली नाहीतर अर्जदार त्यानंतर हया आयोगाकडे कलम १८ खाली तक्रार करु शकतात. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कुठल्याच प्रकरणात माहिती न देणे किंवा प्रथम अपिल निकाली न काढणे हया बाबी अत्यंत गंभीर आहे व अशा प्रकारे हलगर्जीपणा यापुढे होणार नाही याची दखल प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**